# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ७८७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/११/२०१७

**१) लग्नाचे आमिष दखवुन तरूणी वर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०१/११/२०१७ दरम्यान यातील फिर्यादीस आरोपीने लग्नाचे आमीष दाखवुन फिर्यादी ही अनुसुचीत जातीची आहे. हे माहीत असुन सुध्दा शारीरीक संबध प्रस्थापीत केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३७६ भा.दं.वी. सहकलम. ३,२ (व्ही) अनुसुचीत जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागिय पोलीस अधीकारी भंडारा जोगदंड पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) क्षुल्लक कारणा वरून भांडण करून विटानेव काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/११/२०१७ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी बाबु सिताराम बोरकर वय ५७ वर्ष रा. सकरला याचे लहान मुलाने फोनवर जनावराचे गोठया जवळ आरोपी हा भांडण करीत आहे अशी खबर दिल्या वरून फिर्यादी हा स्वत:चे जनावराचे गोठयाकडे कशाचे भांडण करतात? म्हणुन रस्त्याने जात असतांना, फिर्यादी जवळ येतांना पाहुन यातील आरोपीतांनी संगनमत,भांडण शिवीगाळ करून विटाने व काठीने डोक्यावर मारून फिर्यादीस जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ३२४,५०४,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) अवैध रित्या जनावराची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद:–**

दिनांक २४/११/२०१७ चे २२.५७ वाजता ते २३.५७ वाजता दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. सीजी ०४ एल एम ६६४४ मध्ये २२ जनावरे लहान मोठे बैल कि. १,००००० /रु चे अवैध रित्या वाहतुक करून जनावरांना निर्दयतेने भररून वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. बच्छिल यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ११(१), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९६० सहकलम ८३/११७ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) नौकरी लावुन देण्याचे आमीष दाखवुन फसवणुक केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २०/११/२०१७ चे ०.९०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी संजय कन्हैयाजी मोहकर वय ४५ वर्ष रा. पिपरी यास आरोपीने तुझ्या मुलाला मी एनटीबीसी मौदा येथे नौकरी लावुन देतो, असे आमीष दाखवुन फिर्यादी कडुन ८०,०००/रु घेवुन पसार होवुन फिर्यादीची फसवणुक केल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४२० भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) विवाहीतेचा शारीरीक व मानसीक छळ केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १६/०६/२०१३ ते २०/०९/२०१७ पर्यत दरम्यान यातील फिर्यादी ही व आरोपी पती पत्नी असुन त्यांना १ मुलगा व १ मुलगी आहे यातील आरोपी पती हा दारू पाणी पिऊन फिर्यादीच्या चारीत्र्यावर संशय घेवुन मारहान व शिवीगाळ करून शारीरीक व मानसीक त्रास देवुन छळ करीत असल्याने,फिर्यादीचे तक्रारी वरून पो.स्टे जरीपटका नागपुर येथे अप क्र. ००/१७ कलम ४९८(अ) ५०४ भादवी.चे कागद पत्रावरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४९८(अ),५०४ भा.दं.वी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) अज्ञात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक गंभिर जखमी. :—**

दिनांक २४/११/२०१७ चे २२.२० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ ज्ञानेश्वर गजिराम बुराडे वय ३० वर्श रा. सोलवाडा व गावातील फल्गुन शिरसागर, सिंकदर बुराडे हे हिरो होंडा सिडी एसएस मोटार सायकल क्र. एमएच ३५ ई ५०८३ ने कुमार पेट्रोलपंप लाखनी जवळ एनएच०६ रोडाने गावा कडे येत असता, भंडारा कडुन साकोली कडे जाणाऱ्या अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलला धडक मारून फिर्यादीचा भाऊ ज्ञानेश्वर बुराडे याचे जागिच मरणास व फाल्गुन क्षिरसागर, सिंकदर बुराडे यांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देतावाहनासह पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८,३०४(अ) भा.दं.वी. सहकलम १८४,१३४(ब) मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. पोलीस स्टेशन आडे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**७) सोन्याचे दागिणे व नगदी पैसे चोरून नेल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक २४/११/२०१७ वाजता दरम्यान यातीलफिर्यादी ही बस स्थानक भंडारा वरून लाखनी येथे जाण्यास बस मध्ये बसतांनी कोणीतरी अज्ञात चोराने पर्स मध्ये ठेवलेला १ सोण्याचा मंगळसुत्र वनज ३ तोळे, सोन्याची चपला कंठी वजन ३ तोळे व नगदी ८००/रु असा एकुण १,२०,८००/रु चा माल गर्दीचा फायदा घेवुन चोरून नेल्याने फिर्यादी सौ. किशोरी किशोर कुथे वय ४६ वर्ष रा. आर्दश नगर लाखनी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२५/११/२०१७ चे १७.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी पिवळी वाहन ही एकोडी फाटा येथे आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. खडसे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. खडसे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**९) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक २५/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी,वरठी,तुमसर,सिहोरा,गोबरवाही, साकोली,अडयाळ, लाखांदुर व पवनी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ११ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५२ लिटर हातभट्टी दारू किंमती ४७२०/—रू. व १२ लिटर १५० मिली लिटर देशी दारु + नगदी १२,२०/रु किंमती ४७१६/—रु. तसेच जुगारातुन किंमती १३३/—रु असा एकुण किंमती ९,५६९/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २५/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १५१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०८तीन सिटर वाहनांवरती २७ केसेस व ईतर वाहनांवरती ११६ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.